सत्यमेव जयते

**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, १, बी.जे. रोड, पुणे-०१**

दुरध्वनी क्र. ०२०- २६१२२८४६/४७ email:- agricredit16@gmail.com

जा.क्र.कृषिपत-०३/जिमसबँका/ऑनलाईन नोकरभरती/तालिका/२०२४ /७६२ दिनांक – १२/०३/२०२४.

**-: कार्यालयीन आदेश :-**

**विषय – जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील सरळसेवा नोकरभरती प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने राबविण्यासाठी अधिकृत संस्थांची तालिका प्रसिध्द करण्याबाबत.**

**संदर्भ – शासन निर्णय क्र.जिमस ०४१८/६९४/प्र.क्र.६९/२-स,दि.१५.६.२०१८ व सम क्रमांक दिनांक २३.६.२०२२.**

राज्य शासनाने संदर्भिय शासन निर्णय दिनांक २३.६.२०२२ अन्वये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील ऑनलाईन नोकरभरती प्रक्रिया राबविण्यासाठी अधिकृत संस्थांची / एजन्सी यांची राज्यस्तरीय तालिका / पॅनल सहकार आयुक्तालयाच्या स्तरावर तयार करण्याबाबत आदेशित केले आहे. त्यानुसार खाली नमुद केल्याप्रमाणे अधिकृत संस्थांची तालिका प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | पत्रव्यवहाराचा पत्ता | संपर्क क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|---|
| 1 | **IBPS.** Institute of Banking Personnel Selection | IBPS House, Near Thakur Polytechnic 90 D.P. Road Off Western Express Highway, Kandivali (E) Mumbai - 400 101 | Associate Division Head 29687000/ 2854, 3310, 3275, 6290, 9077 | ibps.contact.gom@ibps.in cr2@ibps.in director@ibps.in. |
| 2 | **TCS- ION.** Tata Consultancy Services Ltd., | TCS Olympus A, 9th floor, Rodas Enclave, Park Lane, Hiranandani Estate, Thane (W) , Thane – 400 607 | Regional Sales Head 9321840200 | dipankar.1@tcs.com |
| 3 | **ITI Ltd** Indian Telephone Industries Ltd. | National Insurance Building, 1st floor, 27 A K Nayak Road, Fort, Mumbai -1 | Umesh Autade, Project Manager 9822319240 / 7888026080 | uidei_mumbairo@itiltd.co.in rnveikey_mspwz1@itiltd.co.in |
| 4 | **BECIL.** Broadcast Engineering Consultants India Ltd | 162, 2nd Main, 1st Cross, AGS Layout, RMV 2nd Stage, Bengaluru 560094 | Usha Mangalgi, General Manager 9686102096 | usha@becil.com |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | **MKCL** – Maharashtra Knowledge Corporation Ltd | ICC Trade Tower A Wing 5th Floor, Senapati Bapat Road, Shivajinagar Pune 411016. | Sameer Pande Joint Managing Director 9822002394/ 9920849856 | jmd@mkcl.org anupamn@mkcl.org |
| 6 | Workwell Infotech Pvt.Ltd Pune | 202, 2nd Floor Business Square DSK Ranwara Road Bavdhan Khurd Tehsil, Haveli, Bavdhan, Pune, Pune City-411021 | Prafull Shirbhate, Director 8999779124 / 9168711276 | support@workwellinfo.in prafull.shirbhate@gmail.com. |

सदर तालिकेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

१) सदर तालिकेची मुदत याबाबतच्या पुढील आदेशापर्यत राहील.

२) तालिकेमधील संस्थेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमधील सरळसेवा भरती प्रक्रिया फक्त संगणकीय ऑनलाईन पध्दतीने व संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीनुसार राबवावी.

३) ऑनलाईन नोकरभरती प्रक्रिया निर्विवाद व पारदर्शकपणे होईल याची जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

४) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी संचालक मंडळ ठरावाव्दारे या तालिकेमधील संस्थेची ऑनलाईन सरळसेवा भरती प्रक्रियेसाठी नियुक्ती करावी व संदर्भिय शासन निर्णय दिनांक १५.६.२०१८ व दि.२३.६.२०२२ मध्ये नमुद अटी शर्तीचे पालन करावे.

५) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी तालिकेमधील सर्व अधिकृत संस्थांना पत्र देऊन ऑनलाईन परीक्षा प्रक्रियेबाबत निविदा मागवाव्यात व प्राप्त निविदानुसार ऑनलाईन भरती प्रक्रिया सक्षमरित्या व कार्यक्षमपणे राबविण्याची संबंधीत संस्थेची क्षमता, अनुभव व विश्वासार्हतता विचारात घेऊन अधिकृत संस्थेच्या नियुक्तीबाबत संचालक मंडळ ठरावाव्दारे निर्णय घ्यावा.

६) ऑनलाईन परीक्षा प्रक्रिया खर्चाबाबत बँक व संबंधीत संस्थेने सामंजस्याने निर्णय घ्यावा.

७) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत नियुक्त केलेल्या अधिकृत संस्थेबरोबर गोपनीयतेचा व अन्य मुददे समाविष्ठ असलेला करार करण्यात यावा.

८) अधिकृत संस्थेच्या कामकाजाबाबत वाद,तक्रारी उदभवल्यास याची दखल घेऊन आवश्यक कार्यवाही करण्याची जबाबदारी संबंधीत बँकेची राहील. तसेच नोकरभरती प्रक्रिया राबविताना कोणत्याही टप्प्यावर संस्थेने स्वत:हुन अथवा बँक व्यवस्थापनाच्या दबावाखाली भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यकतेप्रमाणे भरती प्रक्रिया स्थगित / रदद

करण्याबाबत तसेच आवश्यकतेप्रमाणे संबंधीत संस्थेविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्याची प्राथमिक जबाबदारी संबंधीत बँकेची राहील.

९) तालिकेवरील अधिकृत संस्थेकडुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमधील ऑनलाईन नोकरभरती प्रक्रियेमध्ये गैरव्यवहार तथा अनियमितता निदर्शनास आल्यास संबंधीत संस्थेचे नाव तालिकेमधुन कमी करण्यात येईल व अशा संस्थेस काळया यादीत समाविष्ठ केले जाईल.

१०) सदर तालिकेमध्ये अन्य पात्र अधिकृत संस्थांचा समावेश करण्यासाठी यथावकाश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

(शैलेश कोतमिरे)
**अपर आयुक्त व विशेष निबंधक**
**सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य,पुणे.**

**प्रति,**

१. संबंधीत अधिकृत संस्था (ई-मेलव्दारे)
२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (सर्व) (ई-मेलव्दारे)
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.मुंबई (ई-मेलव्दारे)

**प्रत माहितीस्तव –**

१. विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, (सर्व) (ई-मेलव्दारे)
२. जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था (सर्व) (ई-मेलव्दारे)

**प्रत कार्यवाहीस्तव –**

कार्यासन अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान कार्यासन, सहकार आयुक्तालय यांना सुचित करण्यात येते की, सदर अधिकृत संस्थांची तालिका विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीस देण्यात यावी.

**प्रत सविनय सादर –**

१. मा.अपर मुख्य सचिव (सहकार) महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई.
२. मा.मुख्य महाप्रबंधक, राष्ट्रीय बँक तथा नाबार्ड, शिवाजीनगर,पुणे-५.